नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ०८ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### सहलींमधून एसटीला १२७ कोटींचे उत्पन्न

मुंबई (स. गांवकरी) : राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) गेल्या वर्षीच्या शैक्षणिक वर्षात शालेय सहलींमधून १२७ कोटी १८ लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले. हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक आहे. योग्य नियोजन केल्यास एसटीच्या उत्पन्नात भर पडू शकते, असे या सहलींवरुन स्पष्ट झाले आहे, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. प्राथमिक, माध्यमिक, आणि उच्च माध्यमिक शालेय वर्षात दरवर्षी परिक्षांच्या अगोदर वार्षिक सहल आयोजित केल्या जातात. विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असतात. या सहली एसटीच्या माध्यमातून आयोजित केल्यास विद्यार्थ्यांना प्रवासी भाड्यात शासनाकडून ५० टक्के सवलत दिली जाते. एसटीच्या माध्यमातून या सहली आयोजित केल्यास त्या सुरक्षित, विश्वासार्ह आणि माफक दरात उपलब्ध होतात असा शाळा संचालक व पालकांचा विश्वास आहे. ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनीं या सहलींचा लाभ होतो.

### राज्य शासनाचा ‘चित्रपताका’ महोत्सव

मुंबई (स. गांवकरी) : मराठी चित्रपट जगतात गेल्या वर्षीपासून आर्कषणाचा केंद्रबिंदू ठरलेला राज्य शासनाचा ‘चित्रपताका’ चित्रपट महोत्सव यंदा १२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिली. गेल्या वर्षापासून आंतरराष्ट्रीय दर्जाचा ‘चित्रपताका’ मराठी चित्रपट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. पहिल्याच वर्षी या महोत्सवाला चित्रपट रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. त्या पार्श्वभूमीवर यंदा चार दिवसांचा हा महोत्सव अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्याचे निर्देश ॲड.शेलार यांनी दिले.



### सुरक्षित सेवेचा आराखडा तयार करा

मुंबई (स. गांवकरी) : ऑनलाइन मागणी केलेले खाद्य व वस्तू घरपोच पुरवठा करणाऱ्या कामगारांकडून ग्राहकांना सुरक्षित सेवा मिळायला हवी, यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची पडताळणी होणे आवश्यक आहे. ग्राहकांना ही सेवा निर्दोष, सुरक्षित आणि कायद्याच्या चौकटीत मिळायला हवी, याकरिता एक सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात यावा असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. मंत्रालयात कामगार आणि गृह विभागाच्या अधिकाऱ्यांची फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट आदी विविध सेवा पुरवठा करणाऱ्या कंपन्या ग्राहकांना घरपोच सेवा पुरविण्यासाठी वेगळे ‘डिलिव्हरी पार्टनर्स’ नियुक्त करतात. सध्या या कंपन्या त्यांची ऑनलाईन, फेसलेस पद्धतीने नोंदणी करून घेतात. ही माहिती त्रयस्थ संस्थेकडे पाठविली जाते. या संस्थांना पडताळणीचे अधिकार कोणी व कोणत्या निकषांवर दिले. त्यांच्या प्रक्रियेला कायदेशीर आधार काय आहे.

# ट्रम्प अणुबॉम्बचा वापर करणार?



मुंबई : (स. गांवकरी)

‘इराणची संपूर्ण संस्कृती आज रात्री नष्ट होईल’, अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथवरील पोस्टमधून दिल्यानंतर संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे. इराणला दिलेली ४८ तासांची मुदत संपुष्टात येत असून इराणने जर माघार घेत करार केला नाही तर त्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, असे ट्रम्प यांनी ताज्या पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी म्हटले की, आमच्याकडे अशी साधने आहेत जी आम्ही अजून वापरलेली नाहीत. या दोघांच्या विधानांचे वेगवेगळे अर्थ जगभरातील माध्यमे आता काढत आहेत.

ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडिया साईटवर लिहिलेल्या पोस्टमधील मजकूर आधी पाहू. त्यांनी लिहिले, “आज रात्री एक संपूर्ण संस्कृती नष्ट होईल. जी पुन्हा परत कधीही आणता येणार नाही. असे व्हावे, अशी माझी बिलकुल इच्छा नाही. पण कदाचित ते होईलच.” “तथापि, आता पूर्ण सत्तापालट होणार आहे. जिथे वेगळ्या प्रकारचे, हुशार आणि कमी कट्टरतावादी विचारांच्या लोकांचे वर्चस्व असेल. सध्या ठाऊक नाही, पण ते कदाचित काहीतरी क्रांतिकारक अद्भुत असे घडवू शकतील. जगाच्या प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या इतिहासातील आजच्या सर्वात महत्त्वाच्या रात्रीच ते कळू शकेल. ४७ वर्षांची लूटमार, भ्रष्टाचार आणि मृत्यूचे तांडव अखेर संपुष्टात येईल”, असेही ट्रम्प पुढे म्हणाले आहेत. ‘इराणच्या महान लोकांवर देवाचा आशीर्वाद असो’, असेही वाक्य या पोस्टच्या शेवटी ट्रम्प यांनी म्हटले आहे. यावरून ट्रम्प नेमके काय सूचित करू इच्छितात, याचा मात्र अंदाज नाही. व्हान्स पुढे म्हणाले की, ही शस्त्रास्त्रे वापरायचा निर्णय राष्ट्राध्यक्ष ट्रम्प घेऊ शकतात. जर इराणने आपली भूमिका बदलली नाही तर ती वापरायचा निर्णय ते घेऊ शकतात. सोमवारी सकाळी ट्रम्प यांनी म्हटले होते, “इराण एका रात्रीत उद्ध्वस्त केला जाऊ शकतो.” राष्ट्राध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या पाठोपाठ आलेल्या विधानानंतर अमेरिका अण्वस्त्रांचा वापर करेल का? अशी भीती जगभरात निर्माण झाली आहे. द गार्डियनने मंगळवारी दिलेल्या वृत्तानुसार, ट्रम्प यांचे विद्यमान आणि माजी सल्लागार वर्तुळात अशी भीती वाढत आहे की, राष्ट्राध्यक्ष इराणवर अणुहल्ला करण्याचा विचार करू शकतात. ब्रिटिश लेखक आणि पत्रकार ओवेन जोन्स यांनी सोशल मीडियावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, डोनाल्ड ट्रम्प इराणविरोधात अण्वस्त्रे वापरण्याची स्पष्टपणे धमकी देत आहेत. ही आपत्ती टाळण्यासाठी त्यांना अध्यक्षपदावरून हटवले पाहिजे. संयुक्त राष्ट्रांचे राजनयिक आणि पॅट्रिऑटिक व्हिजन असोसिएशनचे संयुक्त राष्ट्रांमधील दीर्घकाळ प्रतिनिधी असलेल्या मोहम्मद सफा यांनी काही दिवसांपूर्वी याच प्रकारचा गंभीर आरोप केला होता. “संयुक्त राष्ट्रे इराणमध्ये संभाव्य अण्वस्त्र वापराची तयारी करत असताना आपण याचे साक्षीदार होऊ इच्छित नाही”, असे सांगत सफा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

### उपाध्यक्ष व्हान्स यांचे विधान काय?

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या संस्कृतीचा विनाश करण्याची पोस्ट केल्यानंतर काही वेळेतच उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांचेही खळबळजनक विधान समोर आले. इराणला इशारा देताना व्हान्स म्हणाले की, अमेरिकेने आपली बहुतेक लष्करी उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. आता काही तासांची वेळ उरली आहे. त्यांना (इराण) हे कळायला हवे की, आमच्याकडे अशी शस्त्रास्त्रे आहेत, ज्याचा वापर करण्याचा निर्णय आम्ही अद्याप घेतलेला नाही.

दरम्यान व्हाईट हाऊसने मात्र उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांच्या विधानानंतर सुरू झालेली अण्वस्त्राच्या वापराची चर्चा फेटाळून लावली. आमच्याकडे अशी शस्त्रास्त्रे आहेत, ज्याचा वापर करण्याचा निर्णय आम्ही अद्याप घेतलेला नाही, या विधानावर स्पष्टीकरण देताना व्हाईट हाऊसने म्हटले की, उपाध्यक्षांचा बोलण्याचा तसा अर्थ निघत नाही.

# अंगणवाडी सेविकांच्या मानधन

## प्रोत्साहन भत्त्यासाठी १७४ कोटी

मुंबई : (स. गांवकरी)



अंगणवाडी सेविकांच्या मानधन, प्रोत्साहन भत्त्यासाठी आता वाट पाहावी लागणार नाही. मार्च महिन्याच्या मानधन व भत्त्यासाठी सरकारकडून १७४ कोटींचा निधी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तांकडे वितरीत करण्यात आला आहे.

राज्यात १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये सुमारे १ लाख ९ हजार ६५९ अंगणवाडी सेविका आणि १ लाख ६ हजार ७४२ अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. त्यांना निधी मिळत नसल्याने आर्थिक संघर्ष करावा लागत असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत होती. अंगणवाडी सेविकांना १३००० तर मदतनीसांना ७ हजार ५०० रुपये मानधन दिले जाते. त्यातील केंद्राचा वाट अनुक्रमे ४५०० व ३५०० रुपये आहे. या कर्मचाऱ्यांचे मानधन केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६० टक्के व ४० टक्के हिस्स्यातून दिले जाते. मात्र केंद्राचा हिस्सा रखडल्याने अंगणवाडी सेविकांची आर्थिक कोंडी झाल्याची टीका करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या अंगणवाडी सेविकांना अन्य कामांसाठी दिला जाणारा प्रोत्साहन भत्ताही मिळत नसल्याची विरोधकांची टीका होती. मात्र हा हिस्सा सरकारकडून नियमित दिला जात असल्याचे स्पष्टीकरणही सरकारकडून देण्यात आले होते. सरकारने मार्च महिन्याच्या मानधन व प्रोत्साहन भत्त्यासाठी सरकारकडून निधीचे वितरण करण्यात आले असल्याने अंगणवाडी सेविका व मदतनीसांना दिलासा मिळाला आहे.

### केंद्र सरकारचा हिस्साही मिळणार

केंद्र सरकारचा हिस्सा मिळण्यासाठी एसएनए स्पर्श प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. या प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करणे व केंद्र शासनाची मंजुरी मिळवणे आवश्यक होते. या परवानगीसाठी राज्य सरकारकडून सर्व तांत्रिक बांबींची पूर्तता करण्यात आली असून केंद्र सरकारची मंजुरीही मिळाली आहे. ही प्रणाली कार्यरत झाल्यामुळे आता केंद्र सरकारचा हिस्साही अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना मिळणार आहे.

# सुप्रिया सुळे, रोहित पवार यांची पार्थ पवारांच्या विधानापासून फारकत?

मुंबई : (स. गांवकरी)



बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोट निवडणुकीत काँग्रेस पक्षाने उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात काही गैर वाटत नाही. काँग्रेसची भूमिका लोकशाही पद्धतीची आहे, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी मांडली आहे. बारामतीच्या पोट निवडणुकीत काँग्रेसने उमेदवार दिल्यामुळे खासदार पार्थ पवार यांनी महाराष्ट्रात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू आहे, अशी टिका केली होती. त्यावरून सुळे यांनी पार्थ पवार यांच्या विधानापासून फारकत घेत काँगेसने काहीही गैर केले नाही, असे म्हटले आहे. कोणताही राजकीय पक्ष संविधानाच्या चौकटीत काम करत असतो. आपण लोकशाहीवर प्रेम करणारे लोकं आहोत. आम्ही सर्वांनी काँग्रेस पक्ष जवळून पाहिला आहे. काँग्रेसच्या मतांवर निवडून आलो आहोत. काँग्रेसचे देशासाठीचे योगदान कोणीही विसरु शकत नाही, असेही सुळे यांनी म्हटले आहे. माझ्यासाठी बारामती ही एक अतिशय भावनिक गोष्ट आहे. आज पवार कुटुंबाची जी ओळख आहे. सहा दशकं पवार नाव हे महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात आणि देशाच्या राजकारणात आहे. हे फक्त आणि फक्त बारामती आणि महाराष्ट्राच्या तमाम मायबाप जनतेमुळे, असेही सुळे म्हणाल्या. कुठलाही पक्ष तसा संपत नसतो : रोहित पवार तुम्ही सत्तेत असला किंवा विरोधात असला, तुम्हाला जमिनीवर राहणे महत्त्वाचे आहे. पार्थ पवार यांनी जे विधान केले, ते योग्य नव्हते.

# ‘महाशक्तीसमोर शरणागती पत्करणाऱ्यांनी काँग्रेसविषयी बोलू नये!

### काँग्रेसचे पार्थ पवार यांना प्रत्युत्तर



मुंबई : (स. गांवकरी)

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार उभा केल्याबद्दल काँग्रेसची अधोगती सुरू झाला असल्याची टीका राष्ट्रवादीचे (अजित पवार) खासदार पार्थ पवार यांनी केली. याला काँग्रेसकडून प्रत्युत्तर देण्यात आले असून स्वतःच्या वडिलांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूनंतर लगेच जमीन घोटाळ्यातील चौकशीतून बचावासाठी राजकीय सोय म्हणून शांत राहणाऱ्या आणि महाशक्तीसमोर शरणागत झालेल्या या कृतघ्न मुलाने कॉंग्रेस पक्षाबद्दल न बोललेलंच बरे राहील, असा उपरोधिक सल्ला काँग्रेसकडून देण्यात आला. पार्थ पवार यांच्या टीकेला काँग्रेसने आज एक्स या माध्यमातून उत्तर दिले. धड भाषणही न देता येणाऱ्या, कुटुंबीयांच्या पूर्वपुण्याईवर आताच खासदार झालेल्या मुलाने कॉंग्रेस पक्षाच्या अधोगतीबद्दल बोलणे म्हणजे जरा जास्तच झाले.

या मुलाच्या वडिलांना न्याय मिळवून देण्यासाठी कर्नाटक सरकारने त्यांच्या राज्यात एफआयआर नोंद करून घेतला. तिथे सरकार काँग्रेस पक्षाचे आहे.

कॉंग्रेस पक्षाचेच बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील अधिकृत उमेदवार त्या संशयास्पद अपघाताचा महाराष्ट्रात गुन्हा नोंद करा निवडणुकीतून माघार घेईन, अशी मागणी करत आहेत. यावरही या कृतघ्न मुलाने बोलायला हवे, असे काँग्रेसने म्हटले आहे. जी जनभावना आहे त्याकडे मुख्यमंत्री दुर्लक्ष करत आहेत. बारामतीत अजित पवार यांचा झालेला विमान अपघात हा अपघात होता की घातपात याचे शंका निरसन व्हावे ही महाराष्ट्राची खरी जनभावना आहे.

विमान अपघात प्रश्नी एफआयआर दाखल करून ताबडतोब चौकशी करण्याचे कर्तव्य फडणवीस यांना करता आले असते, पण त्यांनी ते केले नाही. त्याकडे ते दुर्लक्ष करत आहेत.

अजितदादांच्या अपघात प्रकरणी गुन्हा दाखल करून निष्पक्ष तपास व्हावा ही खरी जनभावना आहे, असे सपकाळ म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांचे लोका सांगे ब्रह्मज्ञान – हर्षवर्धन सपकाळ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनही बारामती विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, असे आवाहन केले जात आहे. यालाही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्युत्तर दिले. विधानसभेची पोटनिवडणूक जनभावना लक्षात घेऊन बिनविरोध व्हायला हवी, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान म्हणजे ‘लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण, अशी टीका त्यांनी केली.

# १४ महिने झुंज देत अखेर नीलमचा अमेरिकेत मृत्यू

### पण, तिने जिंकली अवयवदानातून मानवतेची लढाई...



कराड : (स. गांवकरी)

अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्याची राजधानी सॅक्रोमेंटो शहरात १४ महिन्यांपूर्वी झालेल्या भीषण अपघातानंतर तेथील रुग्णालयात उपचार घेणाऱ्या नीलम तानाजी शिंदे या ३५ वर्षीय युवतीची मृत्यूशी झुंज अखेर संपली. मात्र, तिने अवयवदानातून मानवतेची लढाई जिंकत आपली आठवण मागे सोडली आहे. नीलमच्या मागे वडील, भाऊ असा छोटा परिवार आहे. कराड तालुक्यातील वडगाव उंब्रजची सुकन्या नीलम शिंदे या ३५ वर्षीय युवतीची हृदयस्पर्शी कहाणी मन हेलावून टाकणारी आहे. नीलम ही अनेक वर्षांपासून अमेरिकेत नोकरी करत संगणकीय शास्त्राच्या ‘एमएस’ या उच्च पदवीचे शिक्षण घेत होती. सुरुवातील ‘नासा’ या अवकाश संशोधन संस्थेत ती कार्यरत होती. गेल्या सव्वादोन वर्षांपूर्वी तिच्या आईचे निधन झाल्याने नीलम गावी आली होती. आणि नंतर तिने पुन्हा अमेरिकेला जावून अन्य ठिकाणी नोकरी करत आपले शिक्षण सुरु ठेवले. दरम्यान, १४ फेब्रुवारी २०२५ रोजी मोर्निंग वॉकवेळी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने डोक्यासह अन्यत्र गंभीर इजा होवून ती बेशुध्दावस्थेत सॅक्रोमेंटो शहरात अत्याधुनिक रुग्णालयात उपचार घेत होती. या उपचारात तिचा मेंदू पूर्णपणे कार्यरत होऊ शकला नाही. आणि दीर्घकाळ बेशुध्दावस्थेतील नीलमचा २८ मार्चला उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. ही वार्ता समजताच तिच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला. नातवाईक व ग्रामस्थ शोकमग्न झाले. मात्र, युध्दाच्या परिस्थितीमुळे तिचे वडील तानाजी शिंदे अथवा कोणासही तिच्या अंत्यसंस्कारासाठी अमेरिकेला जाता आले नाही, हे आणखी दुर्दैवी ठरले. नीलमने जिवंतपणी अवयवदानाचा निर्णय घेतला होता. तिच्या कुटुंबीयांनी तिची ही शेवटची इच्छा पूर्ण करत, तिचे अवयवदान केले. अवयवदानाच्या प्रक्रियेस आठवड्याभराचा कालावधी लागला. ‘करोडो भारतीयांचे आशीर्वाद तिच्यासोबत होते, पण नियतीपुढे सर्व हतबल ठरले,’ अशी भावना तिचे मामा संजय कदम यांनी व्यक्त केली. अमेरिकेत हिंदू परंपरेनुसार तिच्यावर होणाऱ्या अंत्यसंस्काराची जबाबदारी अमेरिकन नागरिकत्व स्वीकारलेली नीलमची आत्या जयश्री शिंदे पार पाडतील. ‘सॅक्रोमेंटो’मधील १४ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या अपघातामुळे नीलम बेशुध्दावस्थेत उपचार घेत असल्याची माहिती तिच्या कुटुंबीयांना मिळाल्यानंतर त्यावेळी तिच्याकडे जाण्यासाठी तिचे कुटुंब आतुरलेले असताना, तिच्या वडिलांना तातडीने अमेरिकेत जाण्यासाठी व्हिसा (प्रवेशाज्ञा) मिळण्यात मोठ्या अडचणी आल्या.

### अवयवदानातून ती जिवंतच !

नीलमचे मामा संजय कदम म्हणाले, नीलमच्या फुफ्फुसात संसर्गामुळे ती २८ मार्चला निधन पावल्याचे उपचारकर्त्या डॉक्टरांनी सांगितले. मात्र, युद्धस्थितीमुळे अमेरिकेत असलेल्या नातेवाईकांनीच अंत्यविधीची तयारी केली. नीलमने अवयवदानाचा निर्णय घेतला होता, तो आम्ही पूर्ण केला. तिच्या जाण्याचे दुःख मोठे आहे, पण तिच्या अवयवांमुळे इतरांना जीवदान मिळेल, त्यातून नीलम जिवंतच असल्याचे समाधान आहे अशी भावना संजय कदम यांनी व्यक्त केली.

# समता पतसंस्थेत खरातकडून परिवहन अधिकाऱ्यांच्या नावेही खाती

### ५७ पैकी २६ खातेदारांचे जबाब... सह्या बनावट असल्याची तक्रार

राहाता : (स. गांवकरी)



भोंदूबाबा अशोक खरात याने समता पतसंस्थेत दोन वरिष्ठ परिवहन अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे तीन तर खरात याच्या बहीण आणि भाच्यासह नाशिक येथील वैद्यकीय व्यवसायिक दाम्पत्याच्या नावे दोन खाती उघडल्याचे पोलीस तपासात समोर आल्याची माहिती शिर्डी पोलिस ठाण्याचे निरक्षक रणजीत गलांडे यांनी दिली. या चौकशीमध्ये दोन वरिष्ठ परिवहन अधिकाऱ्यांसह खरात याच्या बहीण आणि भाच्यासह नाशिक येथील वैद्यकीय व्यवसायिक पती-पत्नीच्या नावेही दोन खाती उघडल्याचे तपासात समोर आले आहे. आज या ७ खातेदारांची चौकशी करुन त्यांचे लेखी जबाब नोंदविण्यात आले. समता पतसंस्थेत आमच्या नावे उघडण्यात आलेल्या खात्यांबाबत आम्हाला काहीही माहिती नाही, असा जबाब या खातेदारांनी शिर्डी पोलिसांकडे नोंदविला आहे. शहरातील समता पतसंस्थेच्या शाखेत ५७ जणांच्या नावे १०० बनावट खात्यातून मोठे आर्थिक व्यवहार झाले असुन मागील तीन दिवसात १९ तर आज ७ असे २६ खातेदारांचे जबाब शिर्डी पोलिसांनी नोंदवले आहेत. पोलिसांनी आजपर्यंत ५७ पैकी २६ खातेधारांची चौकशी करत जबाब नोंदवून घेतले. यातील सर्वच खातेधारकांनी कागदपत्रे खरी असून सही मात्र बनावट असल्याचे सांगत व्यवहार कधी केलेच नसल्याचे जबाब दिले आहेत. या सर्व खात्यांचा वापर अशोक खरात करत असल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे. या सर्व बँकेतील व्यवहारामध्ये पैसे कुणी भरले व कुणी काढले याची माहिती पतसंस्थेकडून मागविण्यात आली आहे. याचा तपशील समोर आल्यानंतर खरातच्या अडचणीत वाढ होणार आहे.



दैनिक समर्थ गांवकरी वर्धापन दिनानिमित्त विशेष अंकाचे प्रकाशन शिर्डी येथे आयोजित करण्यात आले यावेळी विशेष अंकाचे प्रकाशन करताना बिग बॉस फेम दिव्या शिंदे.संपादक दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.कार्यकारी संपादक नवनाथ जाधव.नवी मुंबई संपादक दशरथ चव्हाण.



दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने यावर्षी आरोग्य दुत डॉ गावडे यांना पुरस्कार 2026 प्रदान करताना बिग बॉस फेम सरकार संघठक दिव्या शिंदे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.कार्यकारी संपादक दैनिक समर्थ गांवकरी नवनाथ जाधव.दशरथ चव्हाण अशोक उगले



दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने यावर्षी समाजभूषण पुरस्कार 2026 ...बिग बॉस फेम दिव्या शिंदे प्रदान करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.कार्यकारी संपादक दैनिक समर्थ गांवकरी नवनाथ जाधव. दशरथ चव्हाण अशोक उगले



दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने यावर्षी राज्यस्तरीय ज्ञानज्योती पुरस्कार 2026...परमानंद महाराज यांना प्रदान करताना बिग बॉस फेम दिव्या शिंदे....महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.कार्यकारी संपादक दैनिक समर्थ गांवकरी नवनाथ जाधव.दशरथ चव्हाण अशोक उगले



दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने यावर्षी उद्योजक पुरस्कार 2026 नामांकित उद्योजक सुनिल डांगरा यांना प्रदान करताना बिग बॉस फेम दिव्या शिंदे.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.कार्यकारी संपादक दैनिक समर्थ गांवकरी नवनाथ जाधव.दशरथ चव्हाण अशोक उगले



दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने यावर्षी समाजसेवक पुरस्कार 2026 संतोष कोकणे यांना प्रदान करताना.बिग बॉस स्पर्धक दिव्या शिंदे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.कार्यकारी संपादक दैनिक समर्थ गांवकरी नवनाथ जाधव.दशरथ चव्हाण अशोक उगले


**शिक्षण प्रसारक संस्था** (Reg No.F-41)
घुलेवाडी–४२२६०५, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

**– सूचना –**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांची निवडणूक २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी रविवार, दिनांक २४ मे २०२६ रोजी होणार आहे. संस्थेच्या निवडणूक नियमानुसार होणाऱ्या निवडणूकीकरिता मतदारांची यादी संगमनेर नगरपालिका कला, दा.ज.मालपाणी वाणिज्य आणि ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय, स्वायत्त (संगमनेर महाविद्यालय) येथे गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ रोजी संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येत आहे. मतदार यादीसंबंधी हरकती, दुरुस्ती व सूचना असल्यास सुट्टीचे दिवस सोडून शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ अखेर दुपारी ३.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत श्री.आर.एस.वालझाडे यांचेकडे देण्यात याव्यात. मतदारांची अंतिम यादी शुक्रवार, दि.२४ एप्रिल २०२६ रोजी सायं. ५ .०० वा. संस्थेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली जाईल.

दि. ०८/०४/२०२६.

**ॲड. आर. बी. सोनवणे**, निवडणूक अधिकारी
**डॉ. संजय ओंकारनाथ मालपाणी**, चेअरमन
शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर


# ५०% थकबाकीदार संचालक असलेल्या संस्थांना कर्जपुरवठा बंद

**थकबाकीदार संचालक सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करू नये : जिल्हा बँकेचा निर्णय**

**जिल्हा बँकेने ३१ मार्च अखेर कर्ज भरून घेतले सहा तारखेला मात्र आपला इंगा दाखवला**

**इनामदार संचालकांना कर्ज मिळणार नाही**

**इनामदार कर्ज भरणाऱ्या संचालकांना जिल्हा बँकेने दाखवल्या वाटण्याच्या अक्षदा**

## जिल्हा बँकेच्या निर्णयावर संतप्त प्रतिक्रिया

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयामुळे संपूर्ण सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांमध्ये जर ५० टक्के संचालक थकबाकीदार असतील, तर त्या संस्थेतील सर्व संचालकांना कर्जपुरवठा करू नये, असा आदेश देण्यात आल्याने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या संचालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

जिल्हा बँकेने ३१ मार्च अखेर सर्व थकबाकी कर्जफेड करण्याचे आवाहन करताना, केंद्र व राज्य शासनाकडून व्याज परतावा आणि ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनाची जाहिरात करून अनेकांकडून कर्जफेड करून घेतली. मात्र त्यानंतर ६ मार्च २०२६ रोजी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांनुसार, ज्या विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांमध्ये ५०% संचालक थकबाकीदार आहेत, त्या संस्थेतील सर्व संचालकांना कर्जपुरवठा थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे वेळेवर कर्जफेड करणाऱ्या संचालकांनाही बँकेने "वाटाण्याच्या अक्षदा" दाखवल्याची भावना निर्माण झाली आहे.

या निर्णयामुळे अनेक संचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. "आम्ही वेळेवर कर्जफेड केली, मग आम्हाला कर्ज नाकारले जातेय, हा आमचा गुन्हा आहे का?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. थकबाकीदारांवर कारवाई करण्याऐवजी संपूर्ण संस्थेतील सर्व संचालकांना कर्जबंदी करणे हा अन्यायकारक निर्णय असल्याचे मत व्यक्त होत आहे. काही संचालकांनी तर तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देताना, "आम्ही काय पाकिस्तानातून आलो का?" असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे.



हा निर्णय घेताना संचालक मंडळाला विश्वासात घेण्यात आले का, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. बँक अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली चालते का? चेअरमन यांची भूमिका काय? असे प्रश्न आता पुढे येत आहेत. बँकेतील निर्णयप्रक्रिया पारदर्शक आहे का, यावरही चर्चा सुरू झाली आहे.

एका बाजूला मोठ्या कारखान्यांना कोट्यवधींचे कर्ज दिले जाते, तर दुसरीकडे ग्रामीण भागातील सेवा सोसायट्यांवर कर्जबंदी केली जाते, अशी तीव्र टीका होत आहे. सेवा सोसायट्या या गावातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी महत्त्वाच्या असून, त्यांना कर्जपुरवठा थांबवणे म्हणजे थेट बळीराजाच्या विकासाला अडथळा आणणे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

या प्रकरणात काही ठिकाणी सचिवांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. संस्थांच्या वास्तविक परिस्थितीकडे दुर्लक्ष करून फक्त पगारावर भर दिला जात असल्याचा आरोप होत आहे. तसेच प्रशासक नेमण्याच्या प्रक्रियेबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

## निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकारण तापले

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुका जवळ आल्यामुळे या निर्णयामागे राजकीय हेतू असल्याची चर्चा रंगू लागली आहे. सहकार क्षेत्रातील अनेक पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली असून, "निर्णय तात्काळ मागे घ्या, अन्यथा योग्य वेळी उत्तर दिले जाईल," असा इशारा देण्यात आला आहे.

## निर्णय मागे घेण्याची मागणी तीव्र

प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या संचालकांवर अन्याय होऊ नये, यासाठी हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा जिल्ह्यात मोठ्या आंदोलनाची शक्यता व्यक्त होत असून, सहकार क्षेत्रात तणाव वाढण्याची चिन्हे आहेत.

# मजूर दांम्पत्याच्या मुलीची पुणे पोलीस दलात निवड

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

उदापुर ता:-जुन्नर या ग्रामीण भागातील कष्टकरी मजूर दांम्पत्याची मुलगी आपल्या जिद्द,मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर पुणे शहर पोलीस दलात दाखल झाल्याने उदापुर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्वेता उत्तम माळवे हिची पुणे सिटी पोलीस म्हणून निवड झाल्याची अभिमानास्पद खबर समोर आली आहे. अत्यंत गरीब व कष्टकरी कुटुंबात जन्मलेल्या श्वेताने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणा सोबतच पोलीस भरतीची तयारी केली.त्यात महाविद्यालयात एन.सी.सी.कोर्सचा फायदा घेत अखेर तिच्या मेहनतीला यश मिळाले आणि श्वेताची पुणे शहर पोलीस



दलात निवड झाली श्वेताच्या या यशामुळे माळवे कुटुंबासह उदापुर गावाचा अभिमान वाढला आहे. गावकऱ्यांकडून तिचे अभिनंदन होत असून,अनेक तरुण मुलीं साठी तो प्रेरणास्थान ठरत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी श्वेताचे तिच्या घरी जाऊन अभिनंदन करून तिला पुढील पोलीस दलातील उत्तम सेवेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय परिषदेत अक्षय नेहे यांचे मार्गदर्शन

पुणे : (स. गांवकरी)

दीप्स डिग्री कॉलेज तसेच एजीएस कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने "उद्योजकता व नवोन्मेष : भविष्यकालीन तरुण व्यावसायिक घडविणे" या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत हीरा वेल्थचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय नेहे यांनी "तरुणांमध्ये उद्योजकता कौशल्य विकास" या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. हायब्रिड पद्धतीने पार पडलेल्या या परिषदेत देशभरातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नेहे यांनी आपल्या मार्गदर्शनात उद्योजकता ही केवळ व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया नसून ती एक व्यापक विचारसरणी



आहे, जी प्रत्येक तरुणाने आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. "आपण तरुणांना केवळ नोकरी शोधायला शिकवतो की स्वतःचा मार्ग निर्माण करायला?" या विचारप्रवर्तक प्रश्नाने त्यांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात करत पारंपरिक मानसिकतेला आव्हान दिले. आगामी काळात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीची आवश्यकता असून, ती केवळ शासनावर अवलंबून न राहता उद्योजक मानसिकतेतून साध्य होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

आर्थिक साक्षरतेच्या महत्त्वावर भाष्य करताना नेहे यांनी सांगितले की, कोणत्याही व्यवसायाचा पाया हा आर्थिक शिस्तीत असतो. रोखतेचे व्यवस्थापन, गुंतवणूक नियोजन, विमा संरक्षण आणि सुयोग्य अर्थसंकल्प हे व्यवसाय टिकवून ठेवणारे चार महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. "उद्योजकता शिकवली जात नाही, ती अनुभवातून घडते," असे त्यांनी नमूद करत तरुणांनी प्रत्यक्ष कृती करण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले. हीरा वेल्थच्या माध्यमातून नेहे यांनी शेकडो कुटुंबांना आर्थिक नियोजन, गुंतवणूक व विमा सल्ला देत आर्थिक स्थैर्य निर्माण करून दिले आहे. मर्यादित साधनसामग्री असूनही स्पष्ट दृष्टीकोन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि ज्ञानाच्या बळावर यश संपादन करता येते, असे त्यांनी आपल्या अनुभवातून अधोरेखित केले.परिषदेच्या दरम्यान विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले, ज्यांना नेहे यांनी समर्पक व व्यावहारिक उत्तरे दिली. स्टार्टअप इंडिया, मुद्रा कर्ज आणि स्किल इंडिया यांसारख्या शासकीय योजनांची माहिती देत त्यांनी या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या मार्गदर्शनाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अक्षय नेहे यांचे मार्गदर्शन हे केवळ व्याख्यान न राहता तरुणांसाठी दिशादर्शक ठरले.

# IAT 2026 नोंदणीसाठी १३ एप्रिल अंतिम मुदत

## IISER प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना संधी

पुणे : (स. गांवकरी)

आयआयएसईआर अभियोग्यता चाचणी (IAT) 2026 साठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल २०२६ असून, विज्ञान शिक्षण व संशोधन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शेवटची संधी ठरणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर (https://www.iiseradmission.in/) जाऊन तातडीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. IAT ही परीक्षा देशातील इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER) मध्ये प्रवेशासाठी घेतली जाते. बेरहामपूर, भोपाळ, कोलकाता, मोहाली, पुणे, तिरुवनंतपुरम आणि तिरुपती येथील IISER संस्थांमध्ये बीएस-एमएस (ड्युअल डिग्री) तसेच चार वर्षांच्या बीएस अभ्यासक्रमांसाठी या परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो. यंदा अभ्यासक्रमांच्या पर्यायांमध्ये वाढ करण्यात आली असून, डेटा सायन्स, भूविज्ञान, पर्यावरण विज्ञान यांसारख्या नव्या शाखांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच IISER भोपाळ आणि IISER तिरुपती येथे बीएस व बी.टेक अभ्यासक्रमांचीही संधी उपलब्ध आहे. यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनकेंद्रित वातावरणात विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडविण्याचा मार्ग खुला झाला आहे.

IAT 2026 ही संगणक-आधारित परीक्षा असून, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि भौतिकशास्त्र या विषयांतील प्रत्येकी १५ प्रश्न असे एकूण ६० प्रश्न असतील. परीक्षेसाठी १८० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

यावर्षी IAT चा व्याप्ती वाढवण्यात आला असून,





आयआयटी, आयआयएससी, आयएसीएस आणि आयआयईएसटी शिबपूर यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमधील काही अभ्यासक्रमांसाठीही या परीक्षेचा स्वीकार केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी एकाच परीक्षेतून अधिक पर्याय उपलब्ध होणार आहेत.

उमेदवारांनी अधिकृत वेबसाइटवर जाऊन नोंदणी करावी, युजर आयडी व पासवर्ड तयार करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि शुल्क भरून अर्ज पूर्ण करावा. एकदा अर्ज सादर केल्यानंतर तपशीलात बदल करता येणार नसल्याने सर्व माहिती काळजीपूर्वक भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, उमेदवारांच्या शंकानिरसनासाठी हेल्पडेस्कही उपलब्ध करण्यात आला असून, दूरध्वनी (+91 7205457461) आणि ईमेल (askjac2026@iiserbpr.ac.in) द्वारे संपर्क साधता येणार आहे. IISER संस्था आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेष यासाठी ओळखल्या जात असून, विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा, इंटर्नशिप आणि स्वतंत्र प्रकल्पांच्या माध्यमातून सुरुवातीपासूनच संशोधनात सहभागी होण्याची संधी देतात. त्यामुळे विज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी IAT 2026 ही महत्त्वाची संधी मानली जात आहे.

# प्रशांत वाघमारे यांच्यावरील आरोप चुकीचे

## महापालिका आयुक्तांची भेट घेऊन समर्थकांनी मांडली भूमिका

पुणे : (स. गांवकरी)

पुणे महानगरपालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्यावर करण्यात आलेले आरोप पूर्णतः चुकीचे, निराधार आणि केवळ त्यांचे चारित्र्यहनन करण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहेत, अशी भूमिका घेत आज विविध मान्यवरांच्या शिष्टमंडळाने पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेतली. यावेळी उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील करावे, अशी विनंतीही आयुक्तांना करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून प्रशांत वाघमारे यांच्या संदर्भात समाजमाध्यमांतून आणि बातम्यांमधून पसरवली जाणारी माहिती ही दिशाभूल करणारी आहे. वाघमारे हे एक कर्तव्यदक्ष आणि शहराच्या विकासात मोलाचे योगदान देणारे अधिकारी आहेत. त्यांच्या प्रदीर्घ सेवेला आणि प्रतिमेला धक्का लावण्यासाठी जाणीवपूर्वक हा प्रकार केला जात असल्याचे शिष्टमंडळाने आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. याप्रसंगी उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक ॲड. अविनाश साळवे, बाळासाहेब जानराव, रिपाई शहराध्यक्ष संजय सोनवणे, रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे अध्यक्ष राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे, ॲड. मोहन वाडेकर , माजी नगरसेवक जयदेव रंधवे आदी मान्यवर उपस्थित होते. आयुक्तांशी झालेल्या चर्चेदरम्यान शिष्टमंडळाने स्पष्ट केले की, हा संपूर्ण प्रकार केवळ एका चांगल्या अधिकाऱ्याचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी रचला गेला आहे.

# देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत भाजपाचे कार्य – प्रा. मधुकर राळेभात

## "प्रथम राष्ट्र" तत्त्ववरच भाजपाची वाटचाल – संजय काशिद, शहर अध्यक्ष जामखेड

जामखेड तालुका : (स. गांवकरी)

भाजप जेष्ठ नेते दत्तात्रय राऊत यांच्या हस्ते यावेळी श्रीफळ वाढवून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी बोलताना श्री दताञय राऊत म्हणाले की. आम्ही सन 1981पासून भाजपचे काम करत आहोत. आजचे चित्र पहाता खूप मन भरून येते. कारण त्यावेळी अनेक गावात आम्हाला पाणी पिण्यासाठी मिळत नव्हते. जिप भाड्याने लवकर मिळत नव्हत. मंडप भाड्याने मिळत नव्हते.. खुप खडतर दिवस होते.. पुर्वी गावात ठराविक कार्यकर्ते होते. ठराविक समाजाचे होते. आज पक्ष गावा गावात पोहचला आहे.

सर्व समाजातील घटका पर्यंत पोहचला आहे. मा. शामजी मुखर्जी..





मा. दिनदयाळजी.. मा. अटलबिहारी वाजपेयी जी.. मा अडवाणी जी यांचे स्वप्न साकार झाले आहे. सन 1981ते1993 पर्यंत पक्षाच्या कार्यकर्त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. अपमानास्पद वागणूक मिळत होती. उपेक्षा होत होती.. ते अनुभव आठवल्यावर मन खिन्न होते.. परंतु आजचे चित्र पाहीलयावर मन अभिमानाने भरून येते.. पक्षाचे वरिष्ठ नेते मंडळींनी खूप त्याग केला आहे. आपले पुर्ण आयुष्य पक्षाला वाहीले आहे. लाखो कार्यकर्ते पक्षासाठी रात्रंदिन राबले म्हणून हे दिवस पहायला मिळाले. खुप खुप आनंद वाटतो. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि आपण स्वतःया त्रिसूत्रीवर ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पार्टीची स्थापना माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आज पक्षाचा ४७वा स्थापना दिवस (४६वा वर्धापन दिन) जामखेड येथे पेढे वाटून उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील मा.सभापती प्रा. राम शिंदे यांच्या संपर्क कार्यालयात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. भाजपा कार्यालयात आयोजित कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी एकत्र येत पक्षाच्या विचारधारेचा पुनरुच्चार केला. यावेळी ज्येष्ठ नेते दत्तात्रय राऊत हस्ते श्रीफळ वाढवून तसेच ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात म्हणाले की, देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत भाजपा कार्यरत आहे.देश टिकला तर पक्ष टिकेल आणि पक्ष टिकला तर माणूस टिकेल या विचारावर पक्षाची वाटचाल सुरू आहे. हिंदुत्व टिकले पाहिजे, देशातील जनता गुण्यागोविंदाने राहिली पाहिजे आणि देशाच्या प्रगतीसाठी सर्वसामान्यांनी हातभार लावावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी करत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी संजय काशिद यांनी सांगितले की, पक्षाच्या स्थापनेत देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह श्यामाप्रसाद मुखर्जी तसेच अनेक ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांचे मोठे योगदान आहे. २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विकासाचे नवे पर्व सुरू झाले. सामान्य माणसाच्या कल्याणासाठी अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळेच आज भाजपा केवळ देशातच नव्हे, तर जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जात आहे.पक्षाची ताकद ही कार्यकर्त्यांमध्ये आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने 'प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि आपण स्वतः' या तत्त्वावर काम केले, तर देश अधिक सक्षम होईल, आगामी काळातही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरत विकासाची गती कायम ठेवू.

## थोडक्यात पण महत्वाचे



### लक्ष्मी रोडवर ‘राया’चे दिमाखदार उद्घाटन; नवा पर्याय उपलब्ध

पुणे (स. गांवकरी) : शहरातील गजबजलेल्या लक्ष्मी रोड परिसरात ‘राया’ या नावाजलेल्या Men’s Designer Ethnic Wear शोरूमचा दिमाखदार शुभारंभ उत्साहात पार पडला. हुजूरपागा शाळेजवळ आयोजित या उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांची उपस्थिती लाभली. या शोरूमचे उद्घाटन अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील आणि उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, तसेच जयहिंद ग्रुपचे चेअरमन नागराज जैन, मुख्य संचालक दिनेश जैन आणि संचालक प्रेषित जैन उपस्थित होते. आधुनिक आणि पारंपरिक पोशाखांचा संगम असलेले ‘राया’ हे शोरूम आता पुणेकरांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. येथे शेरवानी, बंदगला, कुर्ता, डिझायनर सूट, इंडो-वेस्टर्न अशा विविध प्रकारच्या समारंभिक पोशाखांची समृद्ध श्रेणी उपलब्ध आहे. या स्टोअरची खासियत म्हणजे ग्राहकांना मिळणारा वैयक्तिक अनुभव. ‘राया’मध्ये असलेल्या फॅब्रिक स्टुडिओमुळे ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार कपडे शिवून घेण्याची सुविधा उपलब्ध असून, प्रत्येक पोशाख परफेक्ट फिट आणि वैयक्तिक शैलीनुसार तयार केला जातो. “पुणेकरांनी या वैविध्यपूर्ण वस्त्रदालनाला भेट देऊन मनपसंत पोशाखांची खरेदी करत एक अनोखा अनुभव घ्यावा,” असे आवाहन संचालक प्रेषित जैन यांनी केले.

### प्रकाश संसारे यांची विधी प्राधिकरणच्या पॅनल लॉयर पदी नियुक्ती



राहुरी (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालय अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे अध्यक्ष व सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी येथील ज्येष्ठविधीज्ञ व नोटरी पब्लिक अँड . प्रकाश संसारे यांची तीन वर्षाकरिता लॉयर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे . अँड. प्रकाश संसारे हे राहुरी व अहिल्यानगर न्यायालयात गेल्या 26 वर्षापासून वकील व्यवसाय करत आहेत अनेक वेगवेगळ्या व गुंतागुंतीच्या खटल्यात त्यांनी काम केलेले आहे. सर्वसामान्य व गरजू लोकांना ते कायदेविषयक मार्गदर्शन करीत असतात. सदर नियुक्ती बाबत अँड. प्रकाश संसारे यांची सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




### मोरडे फूड्स प्रा. लि.कंपनीमध्ये समर्थ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची निवड

बेल्हे (स. गांवकरी) : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे येथे मोरडे फूड्स प्रा. लिमिटेड , या नामांकित कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह उत्साहात पार पडला.या मध्ये सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या कॅम्पस ड्राईव्हसाठी मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विद्यार्थ्यांची निवड एटीट्यूड टेस्ट व एचआर इंटरव्ह्यूच्या माध्यमातून करण्यात आली, अशी माहिती कंपनीचे एचआर संतोष कुमकर यांनी दिली. या निवड प्रक्रियेत मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागातून सना इब्राहिम पठाण व तन्मय सुनील शिंदे,तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातून प्रतीक्षा महेंद्र आहेर , ओंकार बाबाजी उचले , विवेक कैलास लोकरे व समीक्षा अंकुश औटी या विदयार्थ्यांची निवड करण्यात आली. या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी कंपनीकडून हेरम्ब वाकडे (लीड टॅलेंट अक्विझिशन), शशांक जोशी (एचआर), संतोष कुमकर (सीनियर एचआर एक्झिक्युटिव्ह), शंकर गावडे (मॅनेजर इंजिनिअर) व साईनाथ विधाटे (मॅनेजर इंजिनिअर) उपस्थित होते.




### वृषाली मंचचा धवला महोत्सव व सन्मान सोहळा संपन्न

ठाणे (स. गांवकरी) :वृषाली मंच हे महिलांच्या अभिमानाचे, स्वाभिमानाचे आपले हक्काचे व्यासपीठ आहे आपली संस्कृती परंपरा नवीन पिढीत रुजण्याच्या हेतूने व धवलारीन महिलांनी परंपरा जपत केलेल्या सामाजिक सेवेबद्दल कृतज्ञता म्हणुन संस्थेने धवला महोत्सव व सन्मान सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमात धवलारीन महिलांनी वेगवेगळी धवला सादर केली व परंपरेचा जागर केला तसेच अनेक महिलांनी ही परंपरा संपत असल्याची खंत व्यक्त केली कार्यक्रमास उपस्थित महिलांनी विविध लग्न गीतांवर नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत भरली कुणबी भवन येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणुन सौ पुष्पलता प्रकाश पाटील व उपस्थित पाहुण्या महिलांच्या हस्ते सर्व धवलारीन महिलांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन त्यांनी केलेल्या सेवेचा सन्मान करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्ष सौ वृषाली पाटील यांनी केले तर समन्वयक सुरेश पाटील यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मानसी घरात यांनी केले कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष सौ रजनी शिंदे, सई क्लिनिकच्या डॉ. सत्यवती गांजावे -सपाटे, वासिंद च्या उपसरपंच ज्योती भेरे, ज्योती शेखावत, श्रीमती पुष्पा ठाकूर, सौ. नजमा शेख, भारती रसाळ, सौ. शर्मिला गुजरे, सौ.स्वेता पांडव, सौ. कल्पना निमसे, सौ. रेश्मा पडवल यांसह मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या कार्यक्रमासाठी सचिव संगीता सोनारे, सौ समीक्षा पाटील, सौ रुचिका पाटील, सौ. हर्षाली पाटील यांनी मेहनत घेतली

# हभप राधाकृष्ण जी महाराज यांची सदिच्छा भेट

## गुरु हे भक्तांना परमेश्वराशी एकरुप करतात : ह.भ.प. राधाकृष्णजी महाराज

अहिल्यानगर: (स. गांवकरी)



दि.३ एप्रिल ते दि. ९ एप्रिल या कालावधीत श्रीमद भागवत कथेचे दुपारी २ ते ६ यावेळी नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड येथे रामनिवास सतीशचंद्र इंदाणी यांनी भक्तांसाठी कथेचे आयोजन केले आहे.जोधपूर येथील प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद भागवत कथेचे निरूपण केले जात आहे.

संत किसनगिरी नगर येथील गुरुदत्त भक्तीधाम येथे प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली असता देवगड देवस्थानचे महंत गुरुवर्य हभप भास्करगिरीजी महाराज यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी संतांचा अनोखा मिलाप व प्रवचनाचा लाभ भक्तांनी घेतला. यावेळी राधाकृष्णजी महाराज म्हणाले,गुरुदत्त भक्तीधाम मंदिराचा कळस जसा चमकदार आहे तसा मंदिराचा पाया ह भक्कम आहे.येथे सद्गुरू किसनगिरी बाबांची कृपा आहे असे दिसते.या मंदिरात आल्यानंतर देवगडच्या दत्त मंदिरात आल्यासारखेच वाटत आहे. मन प्रसन्न होते.देवगडच्या मंदिराची शिस्त,स्वच्छता व अनुशासन याचे दर्शन या गुरुदत्त भक्ती दाम मंदिरात झाले आहे.गुरु आपल्या जीवनात येतात,प्रत्येक जीवाला भगवंताची जोडण्यासाठी येत असतात.गुरु हे स्वतःला जोडण्यासाठी नाही तर परमेश्वराला भक्तांशी जोडण्यासाठी असतात.ज्या भक्तांवर सदगुरुकृपा आहे.त्यांनाच भास्करगिरीजी बाबा यांच्यासारखे गुरु मिळतात.

श्री क्षेत्र देवगड येथे अधिकमास निमित्त दि.२१ मे ते २७ मे या कालावधीमध्ये "विठ्ठल रस भक्ती महोत्सव" चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवामध्ये श्रीमद् भागवत कथा, कीर्तन तसेच नामदेव भक्ती,तुकाराम भक्ती, तसेच संतांच्या सानिध्यात कथा कीर्तन रस कुंभ होत आहे.याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा.असे आवाहन हभप राधाकृष्णजी महाराजांनी केले आहे.

हभप भास्करगिरी जी महाराज म्हणाले,गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली हा दिवस सुवर्ण अक्षरांमध्ये लिहून ठेवण्यासारखा आहे.गुरु हे सर्वश्रेष्ठ आहे.गुरूप्रती नतमस्तक रहावे.देवाने संत भिन्न नाहीत.देवावर गुरूंवर श्रद्धा ठेवा, धर्मावर निष्ठा बळकट करा,देव देश आणि धर्मासाठी कार्य करा. सद्गुरु हे भक्तिमार्ग सांगत असतात. निस्वार्थ भक्तीने परमेश्वराची प्राप्ती होते.भगवान श्री दत्तात्रय यांच्या कृपेने जीवन सफल होते.

गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात संत मिलनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.याप्रसंगी पाईपलाईन रोड,किसनगिरी नगर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सद्गुरु किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांनी परिश्रम घेतले.

## अहिल्यानगर येथे आदर्श सरपंच पुरस्कार सोहळा संपन्न



श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार सोहळा अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात उज्जैन महाकालचे श्रीमहंत श्रीकांतदास धुमाळ महाराज, आदर्श सरपंच श्री भास्करराव पेरे पाटील, महाराष्ट्रातील नामवंत हवामान तज्ञ श्री पंजाबराव डंख, एलसीबीचे पोलीस निरीक्षक श्री कबाडी साहेब तसेच सरपंच संघटनेचे महाराष्ट्राचे नेते श्री बाबासाहेब पावसे पाटील या मान्यवरांच्या हस्ते आढळगावचे आदर्श सरपंच श्री शिवप्रसाद (सीमा) भाऊसाहेब उबाळे यांना “आदर्श सरपंच” पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी गावातील श्री हनुमंत गिरमकर, श्री बबनराव गव्हाणे, श्री देविदास गव्हाणे, श्री भाऊसाहेब उबाळे, पत्रकार श्री सत्यवान शिंदे, पत्रकार श्री जावेद इनामदार, श्री महेश सकट, श्री तुकाराम छत्तीसे, डॉ. श्री डाळिंबे, श्री अनिल उबाळे, श्री प्रतीक घोडके, श्री माऊली डाळिंबे, संचालक श्री माऊली शेठ उबाळे यांच्यासह अनेक मान्यवर व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## नितेश राणेंवर गुन्हा दाखल करा - मनोज प्रधान

ठाणे : (स. गांवकरी)



मुंब्रा येथील हिंदू संमेलनात मुस्लीम समुदायाबाबत आक्षेपार्ह विधाने करून धार्मिक द्वेष निर्माण करणे, डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात चिथावणी देणे आणि संविधानिक मूल्यांची पायमल्ली करीत राष्ट्रीय सन्मानांचा म्हणजेच संविधानाचा अवमान केल्याप्रकरणी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दिली आहे.

शनिवारी नितेश राणे यांनी मुंब्रा येथील हिंदू संमेलनात अनेक वादग्रस्त विधाने केली होती. मुंब्र्यातील मुस्लीम समाजाविषयी अत्यंत आक्षेपार्ह विधाने केली होती. तसेच, आपण मंत्री आहोत म्हणून ठिक, नाहीतर डॉ.जितेंद्र आव्हाड यांना घरी जाऊ दिले नसते, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाचा राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने तीव्र शब्दात निषेध केला आहे. आज मनोज प्रधान यांच्या नेतृत्वाखाली महिलाध्यक्षा मनिषा भगत, युवक अध्यक्ष अभिजीत पवार यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त संभाजी जाधव आणि नौपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन यांची भेट घेऊन भारतीय न्याय संहिता कलम 299 ( धार्मिक द्वेष पसरवून दंगलीस प्रोत्साहन देणे), कलम 351 (एखाद्या व्यक्तीविरुद्ध चिथावणी देणे) आणि राष्ट्रीय सन्मान - अपमान प्रतिबंधक कायदा 1971 अन्वये गुन्हा दाखल करावा अशी लेखी फिर्याद दिली. मुंब्रा - कौसा भागात अनेक वर्षांपासून हिंदू - मुस्लीम गुण्यागोविंदाने रहात आहेत. त्यांच्यात साधे भांडणही होत नाही. अशा स्थितीत बाहेरून येऊन नितेश राणे दंगल माजविण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब अत्यंत धोकादायक आहे. डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात चिथावणी दिली जात आहे. एकीकडे मंत्रिपदाची शपथ घेताना सर्व जाती- धर्माच्या लोकांना एकत्र घेऊन काम करण्याची संविधानिक शपथ नितेश राणे यांनी घेतली आहे. तर दुसरीकडे विशिष्ट समाजाबाबत आकस ठेवून ते कृती करीत आहेत. हा संविधानिक मूल्यांचा अवमान आहे.

## जादूच्या बहाण्याने भोंदू बाबांनी घातला अनेकांना गंडा

भिवंडी : (स. गांवकरी)

आर्थिक तंगी,व्यवसायातील मंदी,पती पत्नीचे आजारपण व मुलांवरील काळी जादू उतरवण्याच्या बहाण्याने शहरात व ग्रामीण भागात अनेक भोंदू बाबांनी महिलांसह नागरिकांना लाखोंचा गंडा घेतल्याच्या अनेक घटना भिवंडीत घडल्या आहेत. तर काही घटनांमध्ये स्मशानभूमीत काळी जादू केल्या प्रकरणी देखील गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एका प्रकरणात जानेवारी २०२५ मध्ये घरात सुख शांती व आर्थिक प्रगतीसाठी एका मृतदेहाची पूजा करायच्या बहाण्याने भोंदू बाबाने महिलेची ८ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी महिलेने अंधश्रद्धा निर्मूलन सिमितीच्या मदतीने शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असता पोलिसांनी भोंदूबाबाला अटक केली होती. हजरत बाबा उर्फ अमजद असद खान असे अटक करण्यात आलेल्या भोंदू बाबाचे नाव होते. हा भोंदूबाबा

### शहरात आजही अनेक भोंदू बाबा सक्रिय

भिवंडी शहरात आजही अनेक भोंदू बाबा सक्रिय असून आर्थिक तंगी, घरातील क्लेश, शारीरिक व्याधी यांच्यावर उपचार करण्याच्या बहाण्याने हजारो रुपये हे भोंदू बाबा नागरिकांकडून वसूल करत आहेत मात्र याबाबत कुणी स्पष्ट बोलत नसल्याने रात्रीच्या काळोखात हे भोंदू बाबा आपले कार्य उरकून घेतात.

४५ वर्षीय महिलेच्या दुकानात ऑक्टोंबर २०२३ मध्ये ग्राहक म्हणून आला असता चिंताग्रस्त पती सोबत बोलताना तुमच्यावर व मुलावर काळी जादू झाली असून,मुला वरील काळी जादू न उतरवल्यास सहा महिन्यात तो जीव गमावून बसेल अशी भीती दाखवली होती. यावेळी महिलेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांच्यासमोर घरात केलेल्या पुजे दरम्यान अंड्या मधून खिळा काढून दाखवला होता. यानंतर काळ्या जादू साठी मृतदेहाची गरज असून चांदवड मालेगाव येथे मृतदेह मिळणार असल्याचे सांगत पीडित कुटुंबीयांना बाबा चांदवड मालेगाव येथे घेऊन गेले.तेथील एका बाबाच्या साथीदाराने दहा लाख रुपयांत मृतदेह मिळेल असे सांगितल्या नंतर भोंदू बाबाने आठ लाख रुपयांत मृतदेहाचा सौदा केला.त्यांनतर महिलेचा विश्वास बसावा म्हणून एका मृतदेहाचा फोटो मोबाईलवर पाठवला.माहिलेकडे पैसे नसल्याने याच भोंदू बाबाने या पीडित कुटुंबीयाला खाजगी सावकारा कडून महिना नऊ टक्के व्याजाने तीन लाख रुपये कर्जाने पैसे मिळवून दिले.मात्र भोंदू बाबाने कोणतेही काम न करता फसवणूक केल्याचे लक्षात आल्याने पीडित महिलेने अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मुक्ता दाभोळकर यांच्याशी संपर्क साधला असता दाभोलकरांनी शरतील कार्यकर्त्यांना संपर्क साधून पीडित महिलेने दिलेल्या तक्रारी वरून शांतीनगर पोलिस ठाण्यात हजरत बाबा उर्फ अमजद असद खान या विरोधात गुन्हा दाखल केला होता. दुसऱ्या एका प्रकरणात पिंपळास गावातील स्मशानभूमीत अघोरी पूजा करणाऱ्या दोघां विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात ५ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.या दोघांनी गावातील स्मशानभूमीत दोन अनोळखी महिलांचे फोटो लिंबूवर चिटकवून ते लिंबू काळया कपडयामध्ये बांधून अनोळखी महीलांच्या जिवाला धोका व्हावा या उद्देशाने जादुटोणा करण्यासाठी लिंबू बांधलेला काळा कापड पिंपळास गावातील स्मशानभुमीमध्ये ठेवला होता. ही बाब गावातील काहींच्या नजरेत आल्याने गावाचे पोलिस पाटलांनी दोघांविरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

## श्रीगोंदा तालुक्यात आढावा बैठक उत्साहात




श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने राज्यातील संघटनात्मक बळकटीसाठी “संगठन सृजन अभियान” राबविण्याचा निर्णय घेतला असून, त्याअंतर्गत नियुक्त निरीक्षक प्रत्येक तालुक्यात भेट देऊन स्थानिक संघटनात्मक परिस्थितीचा आढावा घेत आहेत. या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा येथे आयोजित आढावा बैठक मुख्य निरीक्षक मा. सरत राऊट, ज्येष्ठ नेते व माजी महसूल मंत्री मा. बाळासाहेब थोरात तसेच आमदार हेमंत तात्या ओगले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. या बैठकीस काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, अहिल्यानगर जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते ज्ञानदेव वाफारे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत ओगले यांच्यासह तालुका व शहर पातळीवरील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साहिल कोहलीने दाद शेळकेला लपेट डाव टाकत केले चितपत

राहुरी : (स. गांवकरी)



> यात्रेनिमित्त राहुरीत 250 मल्लानी राहुरीत हजेरी लावली. यांनाध्ये महिलांच्या देखील कुस्त्या पार पडल्या. कुस्ती पाहण्यासाठी पुरुष वर्गच नाही तर महिलांनी देखील कुस्ती मैदान पाहण्याचा आनंद घेतला. एकूण 150 कुस्त्या पार पडल्या असून 300 मल्लांनी हजेरी लावली.
> **- रावसाहेब (चाचा) तनपुरे मार्तंड देव देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष**

शहराचे ग्रामदैवत मार्तंड देव देवस्थान ट्रस्ट (खंडोबा) महाराज यात्रेनिमित्त भव्य कुस्तीचा फड रंगला. यावेळी हरियाणाचा मल्ल साहिल कोहली ने 2025 महाराष्ट्र केशरी दादा शेळके ला लपेट डाव टाकत चितपत करत टाळ्यांच्या कडकडाटामध्ये 2 लाख 51 हजाराचे रोख पारितोषिक पटकविले. या कुस्त्यांसाठी महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्र बाहेरील देशभरातून आलेल्या सुमारे 250 मल्लांच्या 13 लाख रुपयांच्या कुस्त्या पार पडल्या. या कुस्त्या पार पाडण्यासाठी मला नितीन शिंदे, आप्पा निकम व संभाजी मगदूस यांच्यासह यात्रा कमिटी व गावाकऱ्यांचे मोठे योगदान लाभले असल्याचे मत मार्तंड देव देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष राऊसाहेब (चाचा) तनपुरे यांनी लोकमत शी बोलतांना व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर गटनेते हर्ष तनपुरे नामदेवराव नवले राजेंद्र बापु जाधव प्राध्यापक गणपतराव काकडे रामचंद्र सारण सर दिलीप अण्णा टोम्पे पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर पोलीस निरीक्षक संजय ठेंगे ताराचंद तुरे डॉक्टर मेहत्रे प्रदीप भुजाडे भिकू शेठ भुजाडी रवींद्र आहेर मनोज लोंढे डॉक्टर कलाटे नितीन शिंदे भास्कर आपटे एडवोकेट स्वप्निल सुरेश धोत्रे आदि उपस्थित होते. नांदूर रोड बिहानी माळा जुने बस स्थानक राहुरी येथे अत्याधुनिक पद्धतीने उभारण्यात आलेल्या स्टेडियम मध्ये महाराष्ट्रासह अन्य राज्यातून आलेल्या मल्लांनी हजेरी लावली. तब्बल 150 कुस्तीने उपस्थित मन जिंकले. मनाची कुस्ती मार्तंड देव देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष राऊसाहेब चाचा तनपुरे, सचिव सदाशिव शेळके,प्रतीक तनपुरे व यात्रा कमिटीचे सदस्य यांच्या वतीने 2 लाख 51 हजारांचे बक्षीस देऊन हरियाणाचा मल्ल साहिल कोहली यास सन्मानित करण्यात आले. सोमवार (6) एप्रिल रोजी सायंकाळी 5 ते रात्री 10 या दरम्यान राहुरी येथे खंडोबा यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचा फड रंगला होता तब्बल 13 लाख रुपयांची रोख बक्षीस यावेळी मल्लांना देण्यात आली. कुस्ती पाहण्यासाठी राज्यभरातून कुस्ती शौकीन राहुरी दाखल झाले होते. यात्रेनिमित्त 250 पहिलवानांनी हजेरी लावली.

यावेळी विशेष आकर्षण निवेदक सुरेश धोत्रे ठरले. यावेळी नितीन शिंदे आप्पा निकम संभाजी मगदूम यांनी पंच म्हणून काम पाहिले. यावेळी यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष रावसाहेब (चाचा) तनपुरे, उपाध्यक्ष दिनकर पवार, सचिव सदाशिव शेळके,नवनाथ पवार, संदीप तमनर यांच्यासह यात्रा कमिटीचे कमिटीचे अध्यक्ष विलास वराळे, उपाध्यक्ष तुषार पवार, गौरव तोडमल, खजिनदार अमोल तनपुरे उपखजिनदार दीपक साळवे, सचिव आकाश येवले, उपसचिव अमोल उंडे, सुनिल पवार,शिवाजी वराळे सुनील भुजाडी , दत्तात्रय येवले,नितीन तनपुरे, नयन शिंगी,राजेंद्र उंडे,साहेबराव डावखर,राजेंद्र शेळके,राजेंद्र सरोदे, सुभाष वराळे, गोरक्षनाथ चव्हाण, शिवाजी डौले सोन्याबापु जगधने आदींनी कुस्त्याचे मैदान पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

# अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरु करण्यासाठी प्रयत्न

## तालुका वकील संघाचे नूतन अध्यक्ष ॲड. संग्राम ढेरे यांचा आ. रोहित पवारांच्या हस्ते सत्कार

कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय लवकरात लवकर सुरू व्हावे, यासाठी शासन स्तरावर सर्वोतोपरी प्रयत्न करून पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी दिली. कर्जत तालुका वकील संघाच्या नूतन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ॲड. संग्राम ढेरे यांचा आमदार रोहितदादा पवार यांच्या हस्ते नुकताच शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी



आमदार पवार यांनी निवडून आलेल्या नवीन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले, आणि वकील संघाच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी ते बोलत होते. तर आ.पवार बोलताना म्हणाले, हे न्यायालय लवकर सुरू झाल्यास वकील बांधवांची आणि पक्षकारांची मोठी सोय होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आणि कर्जत येथील न्यायालयीन कामकाजाच्या विस्ताराबाबत महत्त्वाची चर्चा केली. या सत्कार समारंभास ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.बाळासाहेब शिंदे, ॲड. बाळासाहेब रगडे, ॲड. अशोक कोठारी, ॲड. धनराज राणे, ॲड. रामदास पुराणे, ॲड. अनिल मेहेत्रे, ॲड. विठ्ठल सातव यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य गुलाब तनपुरे, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नितीन धांडे, कार्याध्यक्ष भूषण ढेरे आणि मीडिया प्रमुख दीपक यादव राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरही यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे वकील संघ आणि राजकीय पदाधिकारी यांच्यात समन्वयाचे वातावरण पाहायला मिळाले..



ठाणे : मुंब्रा येथील एम एम व्हॅली रोडवर बसला धडक दिल्याने दोन दुचाकीस्वारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार आज दुपारी मुंब्रा येथील एम एम व्हॅली रोडवर हा आपघात घडला असल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून तीन तरुण स्कूटरवरून भरधाव वेगाने जात असताना त्यांची बसला धडक बसली ज्यामुळे दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

## थोडक्यात बातम्या...




### टाटा एआयएकडून पुण्याच्या बदलत्या रूपाला मानवंदना

पुणे (स. गांवकरी) : टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स कंपनीने आपल्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्याच्या बदलत्या शहरी रूपाला उजाळा देणारी विशेष मोहीम सुरू केली आहे. स्थानिक आठवणी आणि भावनिक संदर्भांच्या माध्यमातून शहराच्या विकासाचा प्रवास मांडत, नागरिकांच्या सुरक्षेप्रती कंपनीची सातत्यपूर्ण बांधिलकी अधोरेखित करण्यात आली आहे. या मोहिमेत पुण्याच्या झपाट्याने झालेल्या बदलावर प्रकाश टाकण्यात आला आहे. एकेकाळी शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून ओळखले जाणारे पुणे आज आधुनिक, गतिमान महानगर म्हणून विकसित झाले आहे. मगरपट्टा परिसराचा शेतजमिनीपासून आधुनिक टाऊनशिपपर्यंत झालेला प्रवास यामधून विशेषतः दाखवण्यात आला आहे. “शहरे बदलली, पण सुरक्षा अढळ राहिली” हा संदेश देत ही मोहीम नागरिकांच्या भावविश्वाशी जोडण्याचा प्रयत्न करते. स्थानिक बोलीभाषा आणि ओळखीच्या खुणांमुळे ही मोहीम अधिक जवळची वाटते आणि मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाद्वारे कंपनीने गेल्या २५ वर्षांत ग्राहकांच्या विश्वासाला दिलेले महत्त्व अधोरेखित केले असून, भविष्यातही नागरिकांच्या आर्थिक सुरक्षेसाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

### ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात कुस्ती मल्लांची निवड चाचणी

राजूर (स. गांवकरी) : भारतीय खेल प्राधिकरण नवी दिल्ली यांचे वतीने दि.२४ एप्रिल २०२६ रोजी राजूर येथील सत्यनिकेतन चे ॲड.एम. एन.देशमुख महाविद्यालयात १४ वर्षाखालील कुस्ती मल्लांची निवड चाचणी संपन्न होणार आहे.या निवड चाचणीसाठी दिल्लीहून तज्ञ कुस्ती कोच मा.श्री भोलानाथ पाल निवड चाचणी घेण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी दिली आहे. या निवड चाचणी मध्ये जे कुस्ती मल्ल निवडले जातील त्यांना दरमहा रु.१००० मानधन व दरवर्षी स्पोर्ट्स किट देण्यात येणार आहे.तसेच या निवड झालेल्या कुस्ती मल्लांना साई कुस्ती केंद्राचे कोच आंतरराष्ट्रीय पदक विजेते श्री. तानाजी नरके सर यांच्याकडून कुस्ती प्रशिक्षण मिळणार आहे, तरी अकोले व संगमनेर तालुका परिसरातील सर्व कुस्ती मल्लांनी या निवड चाचणीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.व या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य प्रोफेसर डॉ.भाऊसाहेब देशमूख व साई कुस्ती कोच श्री तानाजी नरके यांनी केले आहे.

### नेवासा तालुक्यात गुन्हेगारी टोळीवर कारवाई; तिघांना जिल्ह्यातून हद्दपार



नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यात सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका गुन्हेगारी टोळीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत टोळी प्रमुखासह तिघांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश जारी केले आहेत. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुभम विश्वास उर्फ विश्वनाथ गर्जे (वय २९, रा. वडुले), आकाश उर्फ दत्तु उर्फ दत्ता उर्फ दत्तात्रय मच्छिंद्र सावंत (वय २५, रा. चिलेखणवाडी) आणि योगेश मच्छिंद्र सावंत (वय २८) यांनी एकत्रितपणे गुन्हेगारी टोळी तयार करून नेवासा तालुक्यात दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. या टोळीने गंभीर दुखापत करणे, शिवीगाळ व दमदाटी, दरोडा टाकणे, अग्नीशस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, गुंगीकारक पदार्थांची विक्री करणे अशा गंभीर स्वरूपाचे एकूण ९ गुन्हे केल्याची नोंद आहे. सन २०२० ते सन २०२५ या कालावधीत टोळीने सातत्याने गुन्हे करत आपले अस्तित्व टिकवून ठेवले. याआधीही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती; मात्र त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झालेली नव्हती. परिणामी, स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते आणि कोणीही उघडपणे तक्रार देण्यास पुढे येत नव्हते. या पार्श्वभूमीवर भविष्यात गंभीर गुन्हे टाळण्यासाठी नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. महेश पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत संबंधित आरोपींना जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निरज राजगुरु यांनी चौकशी करून शिफारस केली होती. सदर प्रस्तावावर सखोल विचार करून संबंधित तिघांना अहिल्यानगर जिल्ह्यातून ३ महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश प्राधिकरणाकडून पारित करण्यात आले आहेत. दरम्यान, जिल्ह्यात संघटित गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलिसांकडून अशा टोळ्यांची माहिती संकलित करून हद्दपारीसारख्या कठोर कारवाया सुरू आहेत. शरीराविरुद्ध, मालमत्तेविरुद्ध, हत्यार कायदा तसेच वाळू चोरीसारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या टोळ्यांवरही अशीच कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# ११ एप्रिल रोजी ‘ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६’ चे आयोजन

## परदेशात शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन

पुणे : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीच्या परदेशी शिक्षण सल्लागार संस्थांपैकी एक असलेल्या Study Smart तर्फे शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत रॉयल कॉनॉट, बोट क्लब, पुणे येथे ‘ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६’चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आणि पालकांना मोफत प्रवेश असून, परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा एक ‘वन-स्टॉप सोल्यूशन’ ठरणार आहे.

पत्रकार परिषदेत Study Smart चे व्यवस्थापकीय संचालक चेतन जैन यांनी सांगितले की, बारावीनंतर किंवा पदवी पूर्ण केल्यानंतर परदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थी पाहतात. मात्र योग्य विद्यापीठाची निवड, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आर्थिक नियोजन आणि निवास व्यवस्था याबाबत अनेकांना संभ्रम असतो. हा गोंधळ दूर करण्यासाठी या फेअरची रचना करण्यात आली असून, यूके, यूएसए, आयर्लंड, जर्मनी, दुबई, युरोप आदी देशांतील ६० पेक्षा अधिक नामांकित विद्यापीठांचे प्रतिनिधी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

या फेअरमध्ये शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य, सप्टेंबर २०२६ प्रवेश प्रक्रिया, स्पॉट ॲडमिशन ऑफर्स, आयएलटीएस सवलत, तसेच शिक्षणानंतरच्या नोकरी व करिअर संधी यावर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यशाळाही आयोजित केल्या जाणार आहेत. तसेच Study Smart चे प्रमाणित तज्ज्ञ समुपदेशक विद्यार्थी व पालकांना वैयक्तिक मार्गदर्शन देऊन त्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करतील. विद्यार्थ्यांच्या अधिक सोयीसाठी करिअर काउन्सेलिंग, शिक्षण कर्ज, निवास व्यवस्था, फॉरेक्स आणि प्रवास सहाय्य यांसाठी स्वतंत्र काउंटर देखील उपलब्ध असतील. विद्यार्थी व पालक विविध कर्ज पर्यायांची माहिती घेऊ शकतील, आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया समजू शकतील आणि परदेशातील शिक्षणासाठी योग्य आर्थिक पर्याय निवडण्याबाबत मार्गदर्शन मिळवू शकतील. या फेअरचे महत्त्व अधोरेखित करताना श्री. जैन यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी थेट संपर्क साधण्याची, विविध अभ्यासक्रमांची




माहिती घेण्याची आणि परदेशात शिक्षणासाठी योग्य दिशा मिळवण्याची ही उत्तम संधी आहे.

‘ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६’साठी नोंदणी पूर्णपणे मोफत आहे. इच्छुक विद्यार्थी व पालक https://studysmart.short.gy/cGRE88 या लिंकवर नोंदणी करू शकतात किंवा अधिक माहितीसाठी ९६५०६ ८००७२ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

# बेवारस व कोमात असलेल्या रुग्णावर स्वखर्चाने उपचार

नेवासा : (स. गांवकरी)

अपघातात जखमी झालेल्या व कोमात असलेल्या पन्नास वर्षीय रुग्णावर नेवासाफाटा येथील आत्मदीप मेडिकल फौंडेशनच्या आत्मदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये स्वखर्चाने उपचार करत असून संबधीत नातेवाईकांनी किंवा व्यक्तींनी याबाबत हॉस्पिटलशी संपर्क साधावा असे आवाहन आत्मदीप फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अविनाश काळे यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती देतांना डॉ.अविनाश काळे म्हणाले की दि.३० मार्च २०२६ रोजी संभाजीनगर-अहिल्यानगर हायवेवर असलेल्या नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम रस्त्यावर सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या



धडकेने सदर व्यक्ती जखमी झाला होता. काही गावकऱ्यांनी याबाबत घटनेची माहिती दिल्यानंतर रुग्णवाहिका चालक निलेश खुळे यांनी या रुग्णाला नेवासाफाटा येथील आत्मदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल केले होते.सदर जखमीच्या मेंदूला गंभीर इजा झाली आहे. आजतागायत त्याचे कोणतेही नातेवाईकाशी आतापर्यंत भेटावयास आले नाही.

# नानासाहेब नाईकवाडी यांचे अपघाती निधन

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक व संपूर्ण तालुक्यात नाना नावाने परिचित असलेले प्रत्येकाचे सुख दुःखात उभे राहणारे समाजिक कार्यकर्ते सर्वांचे नाना अर्थात नानासाहेब नाईकवाडी यांचे काल सोमवारी सकाळी अपघाती निधन झाले. स्व.नाना नाईकवाडी हे एक प्रगतशिल शेतकरीही असल्याने त्यांनी आपल्या शेतातील कांदा राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी नेला होता सोमवारी सकाळी राहुरी बाजार समितीत कांदा लिलावासाठी ते आपल्या मोटारसायकल वर जात असताना सकाळी 9:40 वा.दरम्यान नगर - मनमाड रोड वर कोल्हार च्या पुढे चिंचोली फाटा येथे त्यांचे गाडीचा अपघात होऊन ते गाडीवरून रस्त्यावर पडल्याने डोक्याला ,मेंदूला मार लागला.स्थानिक नागरिकांनी तातडीने रुग्णवाहिकेला संपर्क करून प्रवरा रुग्णालायत नेण्यात आले मात्र डोक्याला जबर मार लागल्याने त्यांची रुग्णालयात जाण्यापूर्वीच निधन झाले असल्याची माहिती मिळाली आहे.त्यानंतर प्रवरा रुग्णालयात शव विच्छेदन करून सायंकाळी 5 वाजता अकोलेतील



सिद्धेश्वर मंदिर जवळील अमरधाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले यावेळी अमरधाम परिसरात मोठ्या संख्येने लोकानी अंत्यविधीसाठी गर्दी झाली होती. प्रत्येकाचे मदतीला धावून येणारे नाना यांचा हास्य विनोद , प्रेमळ स्वभाव व स्पष्टवक्ते पणा यामुळे त्याचा तालुक्यात मोठा मित्र परिवार होता.कायम अकोलेतील रावअंदुरे यांचे चहा दुकानात रोज सकाळी मित्रांना भेटणारे ,गप्पा मारणारे नाना सकाळी 7 वा.मित्रा समवेत चहा घेऊन अचानक अपघातात निधन झालेने सर्वत्र हळहळ वक्त होत आहे .त्यांचे अनेक मित्रांना तर नाना चे अपघाती निधन झाले यावर विश्वासच बसत नाही.

# सुरेगावची स्मशानभूमी, दशक्रिया घाट अतिक्रमण व प्रदूषणाच्या विळख्यात

कोपरगाव : (स. गांवकरी)

गोदावरी नदीच्या काठी असलेल्या ग्रामपंचायतच्या गट नं १६ ह्या शासकीय जागेवर स्मशानभूमी व लगत दशक्रिया विधी घाट असून लाखो रुपये खर्च करून या जागेचा विकास केला आहे परंतु काही गावांतील समाजकंटकाने या शासकीय जागेवर अनाधिकृतपणे विटभट्टी,भुसा,व राख टाकून अतिक्रमण केले असून सदर जागा अतिक्रमण व प्रदूषणाच्या विळख्यात मुक्त करावी असे निवेदन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना पाठवले असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते भागवत कदम यांनी दिली आहे. प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की कोपरगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र सुरेगांव ग्रामपंचायतच्या शासकीय जागेवरील दशक्रिया विधी घाट व स्मशान भूमीच्या जागेवर गावातीलच व्यक्तीने दादागिरी करून अतिक्रमण केले असून या जागेचा स्वतःच्या उपजीविकेसाठी अनधिकृतपणे व्यवसाय थाटला असून या शासकीय जागेवरचे अतिक्रमण काढण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाने सन २००५ पासून तत्कालीन सरपंच



व ग्रामविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली गट नं.१६ मधील अतिक्रमण व प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी शासनदरबारी न्यायासाठी लढत आहे. सदर गट नं. १६ ही सरकारी मालमत्ता असल्यामुळे या जागेवर कोणी अतिक्रमण केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे शासनाचे आदेश असतानाही शासकीय अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने निदर्शनास येत आहे त्यासाठी गट नं. १६ मध्ये सरकारी गटामध्ये राख/भुसा मोठ्या प्रमाणात साठा केल्यामुळे गावातील नागरिकांचे बाहेरील भावीकांचे, लहान मुलांचे व वयोवृध्द नागरिकांचे जिवन धोक्यात आले असून, तेथे ग्रामपंचायतने पाणी पुरवठा योजनेतून पाण्यासाठी पाईपलाईन गेली असून, त्या पाण्याचे साठवण दलित वस्ती साठी जुने गांवठाण सुरेगांव मध्ये आहे. या दशक्रिया घाटावर अनेक विधी होत असताना या दशक्रिया घाटावर महाराज लोकांचे प्रवचनाचे कार्यक्रम होतात त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात राखीचा साठा केल्यामुळे प्रदुषणाचा मोठ्या प्रमाणात परिणाम होतो.चक्रधर स्वामी महानुभव पंथाचे मंदिर असून, तेथे अनके पायी दिंड्या येतात. मोठ्या प्रमाणात यात्रा भरते.तसेच मारुती मंदिराजवळ विवीध प्रकारचे कार्यक्रम होत असतात,लगत गोरोबा काका यांचेही मंदिर असून या विटभट्टी चा निघणारा धुरामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार झाल्याचे निदर्शनास आले असून या शासकीय जागेवरचे अतिक्रमण व प्रदूषणाच्या विळख्यातून गाव मुक्त करावे असेही शेवटी निवेदनात म्हटले आहे.

# वरखेड येथील यात्रेत लाखो भाविकांनी घेतले श्री आई लक्ष्मीदेवीचे दर्शन

## "लक्ष्मीदेवी आईचा उदो उदो"च्या जयघोषाने वरखेडनगरी दुमदुमली

नेवासा : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नेवासा तालुक्यातील वरखेड येथे मंगळवारी दि.७ एप्रिल रोजी श्री आई लक्ष्मीदेवीच्या यात्रेच्या निमित्ताने रखरखत्या उन्हामध्ये ही आई लक्ष्मी मातेच्या नावाचा जयघोष करत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो भाविकांनी दर्शन घेतले.भाविकांनी केलेल्या देवीच्या नावाच्या केलेल्या जयघोषाने वरखेडनगरी दुमदुमली होती



वरखेड येथील यात्रा उत्सव महाराष्ट्रात प्रसिद्ध असा आहे. नवसाला पावणारी आई लक्ष्मीदेवी म्हणून लाखो भाविक यात्रेसाठी येतात आपले नवस फेडतात.मंगळवारी यात्रेच्या मुख्य दिवशी मानाच्या पालखी सह विविध पालख्यांचे फटाक्यांच्या आतषबाजी करत स्वागत करण्यात आले.मंगळवारी मुख्य यात्रा असल्याने सोमवारी रात्रीच बरेच भाविक याठिकाणी मुक्कामासाठी आले होते. मंगळवारी यात्रेच्या मुख्य दिवशी पहाटे पासूनच भाविकांची दर्शन करण्यासाठी मोठी रीघ लागली होती.सदरची यात्रा उत्सव प्रशासनाने ताब्यात घेतल्याने आलेल्या भाविकांचे यात्रा कमिटी व प्रशासकीय अधिकारी व देवस्थान स्ट्रस्टचे अध्यक्ष उपाध्यक्ष व विश्वस्त पदाधिकारी मंडळींनी स्वागत केले.यावेळी नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी यात्रेनिमित्त आई लक्ष्मीदेवीचे दर्शन घेतले. भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांसह पोलीस,पोलीस मित्र,होमगार्ड या यंत्रणेने सेवा देत स्वयंसेवकांची भूमिका बजावली. यात्रेमुळे विविध प्रकारच्या अनेक दुकाने शामियाना उभारून थाटण्यात आली होती.त्यामुळे येथील मंदिर प्रांगण गर्दीने फुलून गेले होते. भाविकांनी नवस फेडण्यासाठी बोकड व कोंबडीचा नैवैद्य देवी चरणी अर्पण केला तर कोणी नवसाची घंटी, कोणी पूरणावरणाचा शाकाहारी नैवैद्य अर्पण करून खणानारळाने ओटी भरून आपल्या नवसाची पूर्तता केली.आई लक्ष्मीदेवीचे मुखवटे डोक्यावर ठेऊन दूरवरून आलेल्या भाविकांनी डफाच्या निनादात वाजतगाजत मिरवणुका काढल्या तर पोतराजांनी आसुडाचे फटके मारत लक्ष्मी आईचा केलेला जयघोष व नृत्य सर्व भाविकांचे आकर्षण ठरले होते. रखरखत्या उन्हाचा तडाखा असतांना देखील देवीच्या दर्शनाची आस भाविकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होती. शिरसगाव पासून ते वरखेड पर्यंतचा रस्ता वाहनांनी व्यापल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.पोलीस संख्या मर्यादित असल्याने पोलीस बंदोबस्तासाठी होमगार्ड, पोलीस मित्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मदत केली,मंदिर परिसरात रस्ते असल्याने ट्रॅफिक जॅम झाली होती त्यामुळे पायी चालणाऱ्यांच्या भाविकांचे ही खूप हाल झाल्याचे चित्र दिसून येत होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)